रे.मु.नं.१०/२०१८
बापू वि. त्र्यंबक

**आदेश नि.क्र.२८**

अर्ज प्रतिवादी क्र.३ विरोधात झालेला विना कैफियत चा आदेश रद्द करणेसाठी आहे.

२. अर्ज, म्हणणे व प्रकरणाचे अवलोकन केले. अर्जदाराचे वतीने युक्तीवाद केला नाही. समोरील बाजूने श्री.पी.एम.घुगे यांना ऐकले.

३. अर्जदार प्रतिवादी क्र.३ चे थोडकयात कथन असे की, तो अशिक्षित असल्याने त्यास पुरेशी माहिती नव्हती त्यामुळे तो मुदतीत विधीज्ञास माहिती देवू शकला नाही. त्यास संधी मिळणे आवश्यक आहे. संधी न मिळाल्यास कधीही न भरून येणारे नुकसान होईल, शेवटी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

४. समोरील बाजूचे थोडकयात म्हणणे असे की, अर्जातील कारणे खोटी व लबाडीचा आहेत, प्रतिवादीने एक वर्ष विलंब केलेला आहे त्याबाबत सबळ कारण नाही, शेवटी अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

५. अर्जास दुजोरा म्हणून शपथपत्र दाखल आहेत. विनाकैफियतचा आदेश दि.०३.१२.२०१८ रोजी झालेला आहे व सदर अर्ज १४.०२.२०१९ रोजी दिलेला आहे. विनाकैफियतचा आदेश झाल्यानंतर वादीतर्फे पुरावा सादर केलेला नाही अथवा मुद्देही निश्चित करण्यात आलेले नाहीत. अशा परिस्थितीमध्ये दाव्याचे स्वरूप विचारात घेता समोरील बाजूस खर्च देण्यावर अर्ज मंजूर करणे न्याय व योग्य दिसुन येते, करिता खालील आदेश.

**आदेश**

अर्ज समोरील बाजूस रू.४००/—(चारशे मात्र) खर्च देण्यावर मंजूर करण्यात येतात.

दि. २७/०६/२०१९

(श.गि.दुबाले)
दि.न्या.क.स्तर, नांदगाव.